प्रेसनोट                दिनांक ०५/०७/२०१८

## उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय नांदेड येथील कर्मचारी सुरेश संभाजी निलेवार यांनी ४,०००/–रु. लाच स्विकारल्यानंतर नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

यातील तक्रारदार यांनी दिनांक ०४/०७/२०१८ रोजी कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाचलूपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली की, " **त्यांनी खरेदी केलेल्या प्लॉटचे पी. आर. कार्डवरील नाव ट्रान्सफर करण्यासाठी उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयात गेले असता त्याठिकाणी निलेवार तक्रारदारास मी इथलाच कर्मचारी आहे साहेबांना सांगुन तुमचे पीआर कार्डचे काम मीच करून देतो कोणालाही भेटू नका असे बोलून निलेवार यांनी ५,०००/–रू. ची लाचेची मागणी करीत असल्याची** तक्रार दिली".

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०५/०७/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन मा.जिल्हाधिकारी कार्यालयाचे पाठीमागील उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाचे परिसरात पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये निलेवार यांनी तक्रारदाराचे **खरेदी केलेल्या प्लॉटचे पी.आर.कार्डवरील नाव साहेबांना सांगुन ट्रान्सफर करून देतो म्हणुन** तक्रारदार व संबंधीत अधिकारी यांचेवर प्रभाव पाडून त्यांचा पदाचा दुरूपयोग करून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेण्याचा उदेशाने तक्रारदार यांचेकडे ५,०००/– रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४,०००/–रू.लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक ०५/०७/२०१८ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये आरोपी लोकसवक सुरेशा संभाजी निलेवार यांनी तक्रारदार यांचे नमुद कामासाठी पंचा समक्ष ४,०००/–रू. लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन वजीराबाद जि.नांदेड येथे आरोपी लोकसेवक सुरेश संभाजी निलेवार, वय ४० वर्ष, व्यवसाय नोकरी, नेमणुक उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय नांदेड यांचे विरुध्द कलम ८ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रंमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रंमाक :– १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रंमाक ०२४६२–२५३५१२
३) श्री संजय कुलकर्णी, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रंमाक ८५५४८५२९९९

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( संजय कुलकर्णी )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

कार्यालय, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि. नांदेड, युनिट